(२९)

जा.क्र. प्राशि/मान्यता/पोआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
दिनांक २५ ऑक्टो. १९९१

प्रति,

शिक्षणाधिकारी प्राथमिक विभाग,
जिल्हा परिषद.

विषय : सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ : शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस १०९१/[५९३९]/प्राशि - ३ चे पत्र दि. ३०/९/९१

उपरोक्त विषयासंबंधिचे आपल्या कार्यालयात पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेले सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खाली नमूद केलेल्या संस्थेला तीच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९१ पासून तो ते सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याचा शर्तीवर विनाअनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथ. शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
| --- | --- | --- | --- |
| प्रगती एज्यु. सोसायटी पिंपरी - १८ | महेशनगर, पिंपरी | १ ली पासुन | इंग्रजी |

१. संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्ट्या सक्षम असली पाहिजे.

२. संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहीत केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधाची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादितील व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दरानेच वतन व भत्ते दिले पाहिजेत.

३. संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांची उदा. वर्गातील विदयार्थ्यांची संख्या, विदयार्थ्यांचे प्रवेश इत्यादि काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

५. ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घ्यावी मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.
१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त ... विश्वस्त

Sheikh
Head Mistress
PRAGATI ENGLISH SCHOOL
Mahesh Nagar, Pimpri,
Pune - 411 018.

Head Mistress
PRAGATI ENGLISH SCHOOL
Mahesh Nagar, Pimpri,

४. संबंधित संस्थेस कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात - घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५. शाळेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६. संस्थेने विहीत नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा.

७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १०/- दंड संस्था कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. सदर प्राथमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही दिनांक ३०/११/९१ पर्यंत पूर्ण करुन त्याबाबतचा सविस्त अहवाल दिनांक २/१२/९१ पर्यंत या कार्यालयास पाठवावा. संस्थेने वरीलपैकी कोणतीही अट पालन करण्यास असमर्थता दर्शविली तर संस्थेना दिलेल्या परवानगीचा फेरविचार तात्काळ करावा व तसा अहवाल या कार्यालयास पाठवावा.

सही/- ०५/१०/९१
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

---

शिक्षण मंडळ कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
शिक्षण/खाप्राशा/१०/१८१/९१
दिनांक : १०/१२/९१

प्रति,

१. संबंधित विभागीय पर्यवेक्षक,

उपरोक्त आदेशामध्ये नमूद केलेल्या अटींचे पालन करणेबाबत आपल्या विभागातील संबंधित शाळेवा सूचना देऊन पूर्तता अहवाल त्वरीत द्यावा.

२. मा. सचिव
प्रगती एज्यु. सोसा.,
पिंपरी १८

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८.

Head Mistress
PRAGATI ENGLISH SCHOOL
Mahesh Nagar, Pimpri